**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022

Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 ईमेल- : vanarti.info@gmail.com

**जावक क्र. वनार्टी/नागपूर/आस्था/671/2026-27** दि.23/07/2026

## -: परिपत्रक :-

**विषय:-** JEE/NEET/MHT-CET **परीक्षापूर्व प्रशिक्षण** (2026–28) **योजनेसाठी यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता** 11 **वी विज्ञान शाखेतील प्रवेशाचा पुरावा** (Admission Slip/Bonafide Certificate) **ऑनलाईन अपलोड करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.**

सन 2026–27 या आर्थिक वर्षात वनार्टी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या **JEE/NEET/MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण** (2026–28) या योजनेसाठी दि. 17/04/2026 रोजी वनार्टीच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची मुदत दि. 17/07/2026 पर्यंत वाढविण्यात आली होती.

यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांनी इयत्ता 11 वी मध्ये **विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्याचा पुरावा** म्हणून **प्रवेश शुल्क पावती** (Admission Slip) अथवा **बोनाफाईड प्रमाणपत्र** (Bonafide Certificate) वनार्टीच्या संकेतस्थळावर **दि.** 26/07/2026 पर्यंत ऑनलाईन अपलोड करावे. याकरिता विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

इयत्ता 11 वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्याचा वैध पुरावा (प्रवेश शुल्क पावती/बोनाफाईड प्रमाणपत्र) निर्धारित मुदतीत सादर करणारे तसेच प्रशिक्षणास नियमित उपस्थित राहणारे विद्यार्थी यांच्यापैकी गुणवत्तेनुसार **Tablet वितरणासाठी** निवड करण्यात येईल.

तथापि, **प्रशिक्षणाचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून, Tablet वितरणासाठीची निवड ही स्वतंत्रपणे गुणवत्तेनुसार करण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**

(प्रशांत वावगे)

**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था

(वनार्टी)